खचण्याचा धोका असणे, चांगल्या घराच्या अपेक्षेने भिमनगरमधील सभासदांनी या प्रस्तावात सामिल होणे, मात्र अद्यापही ५ वर्षे होऊनही त्यांना ताबा न मिळणे, त्यांची मे. ओमकार डेवलपर्स कडून होत असलेली फसवणूक, याप्रकरणी मे. ओमकार डेवलपर्स च्या अध्यक्ष व पदाधिका-यांवर कारवाई करुन झोपडीधारकांना घरांचा ताबा त्वरित देण्याबाबत मुंबई एसआरए संघर्ष समितीने लोकप्रतिनिधी व शासनास निवेदन दिलेले असणे, भिमनगरमधील ३४५ सभासद व त्यांची कुटूंबे यांना घरे देण्याची असलेली आवश्यकता व विकासकावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

(५) **श्री. बच्चू कडू, डॉ. अनिल बोंडे, सर्वश्री. शिरीष चौधरी, विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"वासणी, बोर्डी नाला व राजुरा प्रकल्पांना (ता. अचलपूर, जि. अमरावती) तातडीने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे शासनाने आदेश देवूनही सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने खरेदी विक्रीचे ठप्प झालेले व्यवहार, वासणी प्रकल्पातील बोरगाव दोरी, बोरगाव पेठ, आणि बोरगाव तळणी या गावांचे मागील ८ वर्षांपासून पुनर्वसन न झाल्याने गावातील शेतकरी शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित राहणे, वासणी प्रकल्पातील १३ भूधारकांचे बांधकाम मुल्यांकन रक्कम न मिळणे, राजुरा प्रकल्पाचे ५० टक्केच्यावर काम होवून सुद्धा सुधारित प्रशासकीय मान्यता अभावी थांबलेले काम, पूर्णा, सापन, चंद्रभागा, चारगड, मध्यम सिंचन प्रकल्पाचे काम मागील १० वर्षापूर्वी पूर्ण होवूनही प्रस्तावित सिंचन न होता अत्यंत कमी सिंचन होणे, कालव्याच्या पाटचाऱ्याची पाईप लाईनची कामे अपूर्ण असणे, सापन प्रकल्पाचे काम ९ वर्षापूर्वी पूर्ण होऊनही ६१३४ हेक्टर पैकी केवळ ४३० हेक्टर सिंचन होणे, पूर्णा मध्यम प्रकल्पाअंतर्गत बेलोरा, गणोजा योजनेचा शासनाने आदेश दिल्यावरही सुधारित प्रशासकीय मान्यता न देणे, त्यामुळे शेतकऱ्यांची २००० हेक्टर जमीन सिंचनाच्या लाभापासून वंचित राहणे, शासनाचे दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजीच्या राजपत्रानुसार बागायत जमिनीस जास्त दर देण्याबाबत तरतूद असतानाही जमिनींचे वाढीव दर न मिळणे, प्रकल्प पूर्ण होऊनही सिंचनाचे प्रमाण न वाढल्याने तोट्याची शेती आणि त्यातून कर्जबाजारीपणामुळे आलेल्या नैराश्यातून राज्यातील विविध भागात शेतकऱ्यांच्या लक्षणीय आत्महत्या यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**(सकाळी ११.०० वाजता)**

**तीन** : सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, गणपतराव देशमुख, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, श्रीमती अमिता चव्हाण, श्री. शशिकांत शिंदे, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री डि. पी. सावंत, प्रदिप जाधव-नाईक, नरहरी झिरवाळ, जयकुमार गोरे, पांडुरंग बरोरा, संदिप नाईक, जितेंद्र आव्हाड, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री. भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, सुनिल केदार, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री अमिन पटेल, डि. एस. अहिरे, राजेश टोपे, दत्तात्रय भरणे, हनुमंत डोळस, हर्षवर्धन सपकाळ, अमर काळे, अमित झनक, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री शेख आसिफ शेख रशिद, अस्लम शेख, डॉ. मधुसूदन केंद्रे, श्री. राहुल जगताप, श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर, सर्वश्री राणाजगजितसिंह पाटील, पंकज भुजबळ, संजय कदम, वि.स.स. यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७९ व म.वि.स. नियम ११ अन्वये दिलेला पुढील प्रस्ताव मांडण्यास परवानगी देणे.

"महाराष्ट्र विधानसभेचे, मा. अध्यक्ष यांना अध्यक्ष पदावरुन दूर करण्यात यावे."

**चार** : **लोकलेखा समितीचा सदतिसावा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**पाच** : **सार्वजनिक उपक्रम समितीचा सोळावा अहवाल व सतरावा अनुपालन अहवाल सभागृहास सादर करणे.**

**सहा** : **विधानसभा आश्वासन समितीचा आठवा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**सात** : **अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल सादर करणे.**

**आठ** : **महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीचा सातवा अहवाल सभागृहास सादर करणे.**

**नऊ** : **सभागृहाच्या अवमानाबद्दल "श्री.चंद्रकांत गुडेवार, तत्कालीन आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना सभागृहाच्या न्यायासनासमोर बोलावून समज देणे."**

**दहा** : **स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**अकरा** : **शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ — महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) (सुधारणा) विधेयक, २०१८.**

